# // प्रेस नोट //

दिनांक ०२/०८/२०१८

**लोकसेवक १)लालाजी बाबासाहेब दिवाणे, वय ५५ वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय, बीड, वर्ग-२ , २) शिवाजी सिताराम कांबळे, वय ४१ वर्षे, वनपाल, वन परिक्षेत्र कार्यालय, बीड वर्ग-३, ३) राहुल दत्ता मोरे,वय २८ वर्षे, खाजगी वाहन चालक,रा. लेंडी रोड बीड यांना १५,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

-----------------------------------------------------------------------------------------------------

दि.०१/०८/२०१८ रोजी तक्रारदार यांनी एसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडीलांचे नावे गेवराई येथे सॉ मिल असून सदर सॉ मिल तक्रारदार यांचे नावावर हस्तांतर होणेसाठी तसेच आरा मशिनची परवानगी मिळणेसाठी विभागीय वन अधिकारी कार्यालय, बीड अर्ज दाखल केला होता. त्यानंतर तक्रारदार यांनी विभागीय वन अधिकारी कार्यालय, बीड येथे जावून त्यांचे कामाबाबत विचारणा केली असता वनपरिक्षेत्र अधिकारी दिवाणे यांनी तक्रारदार यांचेकडे १०,०००/- रुपये व वनपाल कांबळे यांनी ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ०१/०८/२०१८ रोजी बीड येथे पंचासमक्ष लाचमागणी बाबत पडताळणी केली असता तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी दिवाणे यांनी १०,०००/- रुपये व वनपाल कांबळे यांनी ५,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक ०२/०८/२०१८ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी दिवाणे व वनपाल कांबळे यांचे विरुध्द वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय, खासबाग बीड परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता **लोकसेवक कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडून ५,०००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली व लोकसेवक दिवाणे यांनी त्यांची १०,०००/- रुपये लाच रक्कम राहुल मोरे यांचेकडे देण्यास सांगीतल्याने दिवाणे यांची लाच रक्कम राहुल मोरे यांनी स्विकारली असता रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यावरुन लोकसेवक १)लालाजी बाबासाहेब दिवाणे,वय ५५ वर्षे, वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय,बीड, वर्ग-२, २) शिवाजी सिताराम कांबळे, वय ४१ वर्षे, वनपाल, वन परिक्षेत्र कार्यालय, बीड वर्ग-३, ३) राहुल दत्ता मोरे,वय २८ वर्षे, खाजगी वाहन चालक,रा. लेंडी रोड बीड** यांचेविरुध्द पोस्टे बीड शहर येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी,पोलीस अधीक्षक एसीबी औरंगाबाद,मा.श्री.एस.आर.जिरगे, अपर पोलीस अधीक्षक, एसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पो.नि. श्री.वाघ,पोह/दादासाहेब केदार, अशोक ठोकळ, पोना/विकास मुंडे,अमोल बागलाने,पोशि/राकेश ठाकुर, प्रदिप विर,कल्याण राठोड, सखाराम घोलप,भरत गारदे,चालक नदीम व मेहत्रे यांनी केली आहे.

नागरिकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| **टोल फ्री क्रमांक** | :- | १०६४ |
| **दुरध्वनी क्रमांक** | :- | ०२४४२/२२२६४९ |
| **मेल आयडी** | :- | dyspacbbeed@gmail.com |
| **वेबसाईट** | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| **मोबाईल ॲप** | :- | www.acbmaharashtra.net |
| **फेसबुक पेज** | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

२/८

**(बाळकृष्ण हनपुडे पाटील)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.**